पोलीस अधीक्षक कार्यालय
जिल्हा विशेष शाखा, जालना

दुरध्वनी क्रमांक :- 02482-225586 Email ID- sp.jalna@mahapolice.gov.in

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम 36 चे आदेश

जा.क्र.जिवाशा/जा/मपोका/36/2025- 4794 जालना दिनांक 25/08/2025

ज्याअर्थी दिनांक 27/08/2025 रोजी पोलीस ठाणे गोंदी हद्दीत मराठा आरक्षण अनुषंगाने आंदोलन यात्रेसाठी मराठवाड्यातील काही मराठा समाज हा दिनांक 26/08/2025 रोजी पासुन अंतरवाली सराटी या ठिकाणी जमणार आहे. त्यामुळे दिनांक 26/08/2025 चे दिवसा मराठवाड्यातील जालना जिल्हा वगळता इतर जिल्हयातील सुमारे 10 ते 12 हजार लोक अंतरवाली सराटी या ठिकाणी जमणार असुन सदर आंदोलन यात्रा ही दिनांक 27/08/2025 रोजी 10.00 वा.मौजे अंतरवाली सराटी ते मुंबई जाणार आहे.

सदर यात्रेसाठी अंतरवाली सराटी येथे दिनांक 27/08/2025 रोजी 40 ते 50 हजार मराठा आंदोलक जमण्याची शक्यता असुन ते सर्व आप-आपल्या वाहनासह हजर होतील तसेच त्यातून सुमारे 10 ते 12 हजार लोक आंदोलन यात्रेत सर्व सामानासह यात्रासुरु करतील व उरलेली लोक त्यांना बळेगाव पर्यंत सोडण्यास येतील याची शक्यता आहे.

त्याअनुषंगाने सदर ठिकाणी मोठ्याप्रमाणात जनसमुदाय हजर राहणार आहे. सदर आंदोलन यात्रेच्या वेळी अडथळा निर्माण होवु नये. रस्ता मोकळा राहावा तसेच रस्त्यावर वाहणे उभी राहुन मार्गात अडथळा निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या दृष्टीने वाहतुकीचे नियमनासाठी या मार्गावरील वाहतुकीस पर्यायी मार्गाने वळविणे (Diversion) क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र पोलीस अधिनीयम 1951 चे कलम 36 अन्वये मला प्रदान केलेल्या शक्ती नुसार मी, **अजय कुमार बंसल, पोलीस अधिक्षक, जालना** खालील प्रमाणे जालना शहरातील वाहतुक नमुद पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश पारीत करित आहोत.

**दिनांक 27/08/2025 रोजी मराठा आंदोलन यात्रेच्या अनुषंगाने वाहतुक नियमन बाबत.**

| अ.क्र. | सध्याचा प्रचलित मार्ग | पर्यायी मार्ग (Diversion) |
|---|---|---|
| 1 | पैठण फाटा शहागड ते पैठण | बीड गेवराई कडुन येणारी पैठण फाटा शहागड मार्गे पैठणकडे जाणारी वाहणे ही शहागड पाचोड एनएच 52 या महामार्गाने एकेरी वाहतुक जाईल-येईल |

वरील आदेश दिनांक 27/08/2025 रोजी 09.00 वाजेपासुन मराठा आंदोलन यात्रा संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरचा आदेश मी अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक जालना माझ्या सही शिक्यनिशी दिनांक 25/08/2025 रोजी जारी केला आहे.

अ) जालना जिल्ह्यातील सर्व पोस्टे, जिल्हाधिकारी कार्यालय जालना, छत्रपती संभाजीनगर, महानगर पालिका जालना, रेल्वे स्टेशन तसेच सार्वजनिक ठिकाणी या अधिसुचनेची प्रत चिटकावी.
ब) महाराष्ट्र शासन राजपत्रात जाहीर करुन
क) स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन हि अधिसुचना आज दिनांक.25/08/2025 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी पारित करण्यात आलेली आहे.

**दिनांक** - 25/08/2025.
**ठिकाण** - जालना.

(अजय कुमार बंसल )भापोसे
**पोलीस अधीक्षक,जालना.**

**प्रति-**

1.पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, बीड
2.उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अंबड
3.पोलीस निरीक्षक गोंदी, अंबड, घनसावंगी, तालुका जालना, पो. नि. शवाशा, जिल्हा वाहतुक शाखा जालना.

**प्रत मा.जिल्हा माहिती अधिकारी जालना.**

/- यांना प्रत देऊन विनंती करण्यात येते की,सदर आदेशास जालना जिल्ह्याचे वर्तमानपत्रात प्रसिध्दी द्यावी.

Scanned with OKEN Scanner